**महाराष्ट्र शासन**
**शिक्षण सहसंचालक, उच्च शिक्षण**
**१७, डॉ. आंबेडकर रोड, पुणे विभाग, पुणे ४११ ००१**
Email Id – jdpunescholarship@gmail.com Website – www.jdhepune.info
फोन नं ०२०-२६१२७८३३ / २६०५१६३२ फॅक्स नं. ०२०-२६०५१६३२

जा.क्र. शिससं/उशि/पुवि/२०१९/शिष्यवृत्ती/ 1888 दिनांक : ०३.०७.२०१९

प्रति,

१. प्राचार्य,
सर्व शासकीय/अशासकीय अनुदानित /विना अनुदानित/
टप्पा अनुदानित/कायम विना अनुदानित वरिष्ठ महाविद्यालये,
पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्हा.
२. कुलसचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.
३. कुलसचिव, डेक्कन महाविद्यालय व पदव्युत्तर संस्था, पुणे.
४. कुलसचिव, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे.
५. कुलसचिव, गोखले अर्थशास्त्र व राज्यशास्त्र संस्था, पुणे.
६. कुलसचिव, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक.

**विषय : - शैक्षणिक संस्था तसेच विभाग स्तरावर प्रलंबित असलेल्या विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्ती अर्जांची तात्काळ पडताळणी करणेबाबत...**

संदर्भ : - मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र. उशिसं/शिष्य-२०१९/ डीबीटी/८७६८ दि. ०२.०७.२०१९.

**उपरोक्त विषयाबाबत सन २०१८-१९ मधील शैक्षणिक संस्था/ महाविद्यालय / विद्यापीठ स्तरावर प्रलंबित असलेल्या शिष्यवृत्ती अर्जांची पडताळणी करणेसाठी शैक्षणिक संस्थांना दि. ०९.०७.२०१९ पर्यंत शेवटची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली असून, अशा प्रलंबित विद्यार्थ्यांची यादी संबंधित शैक्षणिक संस्था / महाविद्यालय / विद्यापीठ यांच्या लॉगीनमध्ये उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.**

दि. ०३.०७.२०१९ रोजीच्या डीबीटी डॅशबोर्डनुसार, खालील प्रमाणे शिष्यवृत्ती योजनानिहाय पडताळणीसाठी अर्ज प्रलंबित असल्याचे आढळून येत आहे.

| INSTITUTE LEVEL PENDING REPORT DATED 3.7.2019 | | | | |
|---|---|---|---|---|
| **F.Y.2018-2019** | **JOINT DIRECTOR HIGHER EDUCATION PUNE REGION PUNE** | | | |
| **Scheme** | **Pending At Institute** | **Voucher Not Redeem** | **Pending At Institute (2nd Installment)** | **Voucher Not Redeem (2nd Installment)** |
| **Assistance to Meritorious Students scholarship - Junior Level** | **185** | **0** | **0** | **0** |
| **Assistance to Meritorious Students scholarship - Senior Level** | **40** | **0** | **0** | **0** |
| **Dr. Punjabrao Deshmukh Vasatigruh Nirvah Bhatta Yojna (DHE)** | **23** | **0** | **0** | **0** |

Scanned by CamScanner

| | | | | |
|---|---|---|---|---|
| Education Concession to the Children Freedom Fighter | 0 | 0 | 0 | 0 |
| Education Concession to the Children of Ex-Servicemen | 15 | 1 | 11 | 0 |
| Eklavya Scholarship | 7 | 0 | 11 | 15 |
| Government Research Adhichatra | 0 | 0 | 0 | 0 |
| Government Vidyaniketan Scholarship | 9 | 0 | 0 | 0 |
| Rajarshi Chhatrapati Shahu Maharaj Shikshan Shulkh Shishyavrutti Scheme | 179 | 1,243 | 1,593 | 313 |
| Scholarship to Meritorious students possessing Mathematics /Physics | 13 | 0 | 0 | 0 |
| State Government Open Merit Scholarship | 35 | 0 | 1 | 0 |
| State Minority Scholarship Part II (DHE) | 29 | 0 | 0 | 0 |
| Grand Total | 535 | 1,244 | 1,616 | 328 |

प्रलंबित अर्ज निकाली काढण्यासाठी ही शेवटची संधी देण्यात आलेली असून, यापुढे कोणत्याही परिस्थितीत मुदतवाढ देण्यात येणार नाही. त्यामुळे प्रलंबित राहिलेल्या अर्जांबाबत भविष्यामध्ये उद्भवणाऱ्या बाबीस संबंधित विद्यापीठाबाबत कुलसचिव / महाविद्यालयातील प्राचार्य सर्वस्वी जबाबदार राहतील.

विद्यार्थ्यांना दुसऱ्या हप्त्याचा शिष्यवृत्ती लाभ देण्यासाठी संबंधित विद्यार्थ्यांची उपस्थितीबाबतची माहिती नमुद करुन विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्ती अर्जावर तात्काळ कार्यवाही करण्यात यावी. ईन्स्टिट्यूट लॉगीन वरुन उपस्थितीबाबतची माहिती नमुद करुन शिष्यवृत्ती अर्ज पुढील टप्प्यवर पाठविल्याशिवाय संबंधित विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्ती रक्कमेचे वितरण होणार नाही. शैक्षणिक संस्था/ महाविद्यालय / विद्यापीठ यांनी कोणत्याही परिस्थितीत त्यांचे स्तरावर एकही शिष्यवृत्ती अर्ज प्रलंबित ठेवू नयेत.

तसेच सद्यस्थितीत उच्च शिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या शिष्यवृत्ती योजनांचे लाभ वितरण सुरु झालेले आहे. विद्यार्थ्यांनी त्यांचे प्रोफाईल लॉगीन करुन त्यांचे अर्जाची स्थिती तपासावी. डीडीओ द्वारे लाभ वितरीत केल्यावर रिडीम बटण सक्रिय होते. शिष्यवृत्ती मंजूर विद्यार्थ्यांना आधार लिंक बँक खात्यात लाभ देण्यासाठी संबंधित विद्यार्थ्यांनी रीडीम बटणावर क्लिक करणे आवश्यक असल्याबाबतचे सूचना विद्यार्थ्यांना देण्यात याव्यात. तसेच शैक्षणिक संस्था/ महाविद्यालय / विद्यापीठ यांनी त्यांच्या क्लर्क आणि प्राचार्य लॉगीन वरील सर्व कार्यवाही मुदतीमध्येच पूर्ण करावी.

(डॉ. विजय नारखेडे)
सहसंचालक, उच्च शिक्षण,
पुणे विभाग, पुणे

प्रत :- मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे ४११००१ यांना माहितीस्तव सादर.

Scanned by CamScanner